आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२८ ऑगस्ट २०२५ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज जपान दौऱ्यावर जाणार

- कापसाच्या गाठीवरच्या आयातशुल्क सवलतीला ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

- पालघर जिल्ह्यात विरार इथं इमारत दुर्घटनेत आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू, राज्य सरकारकडून मृतांच्या कुटुंबांना ५ लाखांची मदत

- राज्यातल्या काही भागात अतिवृष्टी, पुणे-सातार-कोल्हापूरला हवामान विभागाचा ऑरेंज अलर्ट

**आणि**

- ज्येष्ठ अभिनेते बाळ कर्वे यांचं निधन

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संध्याकाळी जपानला रवाना होणार आहे. १५ व्या भारत जपान वार्षिक शिखर परिषदेत ते सहभागी होणार आहेत. जपानचे प्रधानमंत्री शिगेरू इशिबा यांच्यासोबतची ही त्यांची पहिली शिखर परिषद आहे. संरक्षण आणि सुरक्षा, व्यापार, तंत्रज्ञान, आणि नवोन्मेष यावर या बैठकीत चर्चा होईल, असं परराष्ट्र मंत्रालयानं म्हटलं आहे.

दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, प्रधानमंत्री मोदी चीनचे ऱाष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्या आमंत्रणावरून ३१ ऑगस्ट ते १ सप्टेंबर दरम्यान तियानजिन इथं होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी चीनला जातील. शिखर परिषदेच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री शिखर परिषदेत सहभागी होणाऱ्या अनेक नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठका घेण्याची अपेक्षा आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री जन धन योजनेला आज ११ वर्षे पूर्ण होत आहेत. १५ ऑगस्ट २०१४ ला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या उपक्रमाची सुरूवात केली होती. देशातल्या सर्व कुटुंबांना बँकिंग सेवा प्रदान करण्यासाठीची ही सर्वसमावेशक योजना आहे. या योजनेअंतर्गत ५६ कोटींहून अधिक खाती उघडण्यात आली असून, बँकिंग सेवा देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचल्या आहेत.

<><><><><>

केंद्र सरकारनं कापसाच्या गाठीवरील आयातशुल्कातल्या सवलतीला येत्या ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. देशातल्या वस्त्रोद्योग क्षेत्राला पुरेशा प्रमाणात कापूस उपलब्ध व्हावा, यादृष्टीनं हा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी ही मुदत ३० सप्टेंबरपर्यंत होती.

<><><><><>

मुंबईकडे मराठा आरक्षण मोर्चासाठी येणाऱ्या समर्थकांसह मनोज जरांगे पाटील आज पुणे जिल्ह्यात शिवनेरी किल्ल्यावर पोहोचले. यावेळी मनोज जरांगे-पाटील यांनी महायुती सरकारवर टीका केली. मुंबई पोलिसांनी आझाद मैदानावर एक दिवसासाठी आंदोलन करण्याची परवानगी देणं स्वीकारार्ह नसून ओबीसी कोट्यातून मराठा आरक्षणाच्या मागणीच्या समर्थनार्थ बेमुदत उपोषण करणार असल्याचं त्यांनी म्हटलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आरक्षणाला पाठिंबा द्यावा, असंही त्यांनी म्हटलं.

<><><><><>

राज्य सरकार मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या भूमिकेवर ठाम असून कोणत्याही समाजाचं आरक्षण कमी केलं जाणार नाही असं महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केलं. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे नागपुरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. काँग्रेसने आरक्षणाबाबत भूमिका स्पष्ट करावी, असं

मत त्यांनी व्यक्त केलं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आरक्षणासाठी खूप काम केलं असून त्यांच्यावर टीका करणं योग्य नसल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ३१ ऑगस्टला आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १२५ वा भाग असेल.

<><><><><>

स्वदेशी ही भारताची खरी शक्ती असून देशाला पुढे नेण्यासाठी आपल्याला स्वदेशीचा स्वीकार करावा लागेल, असं केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. एक्स या समाज माध्यमावर स्वदेशी अपनाओ' मोहिमेबद्दल केलेल्या पोस्टमध्ये त्यांनी म्हटलं आहे की, स्वदेशी हे फक्त एक कापड किंवा वस्तू नसून तो देशातल्या शेतकऱ्यांच्या कठोर परिश्रमाचा आदर, कारागिरांच्या कौशल्याची ओळख आणि आपल्या उद्योगांचा आदर आहे, असं त्यांनी म्हटलं.

<><><><><>

विरारमध्ये एक इमारत कोसळून झालेल्या दुर्घटनेत आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झालेला आहे. मंगळवारी रात्रीपासून वसई-विरार महानगरपालिका, अग्निशामक दल आणि राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या दोन तुकड्या मदत आणि बचाव कार्य करत आहेत. विरार मधल्या नारंगी इथल्या रमाबाई अपार्टमेंट या चार मजली इमारतीचा मागील भाग मंगळवारी रात्री चाळीवर कोसळला. अपघातग्रस्त इमारतीमध्ये ५० सदनिका होत्या. त्यापैकी अंदाजे १२ सदनिका कोसळल्याची माहिती समोर येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. आतापर्यंत ९ जणांना ढिगाऱ्याखालून सुरक्षित बाहेर काढण्यात आल्याची माहिती फडनवीस यांनी दिली आहे.

**<><><><><>**

जोरदार पावसामुळे राज्यातल्या काही भागात पूर परिस्थिती आणि पडझडीच्या घटना घडल्या आहेत. पुणे घाट, सातारा घाट, कोल्हापूर घाट परिसराला हवामान विभागानं ऑरेंज अलर्ट दिला आहे. तसंच प्रशासनातर्फे NDRF आणि SDRF यांना आपत्कालीन परिस्थितीकरता सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

नांदेड जिल्ह्यात पुन्हा एकदा पूर परिस्थिती गंभीर झाली आहे. जिल्ह्यातील बिलोली, मुखेड, कंधार, नायगाव, लोहा या चार तालुक्यातील १७ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. नदीकाठच्या गावातल्या लोकांना सुरक्षित जागी स्थलांतरित करण्यात आलं आहे. लेंडी प्रकल्प क्षेत्रातली बाधित असलेली हसनाळ, बोरगाव ही गावं पुन्हा पाण्यात बुडाली आहेत. नांदेड - हैदराबाद राज्य महामार्गावरून वाका या ठिकाणी पुराचं पाणी वाहत आहे. दक्षिण मध्य रेल्वेच्या हैदराबाद विभागात काही ठिकाणी रेल्वे मार्गावर पाणी वाहत असल्यामुळे काही गाड्यांच्या मार्गात बदल करण्यात आला आहे.

विष्णुपुरी प्रकल्पाचे तीन दरवाजे उघडण्यात आले असून उर्ध्व मानार धरणाचे ७ दरवाजे उघडले आहेत.

**लातूर** जिल्ह्यात अहमदपूर आणि उदगीर तालुक्यांमध्ये चोबळी नदीसह अनेक नद्यांना पूर आल्यामुळे वायगाव पाटी ते गादेवाडी आणि आतनूर ते देऊळवाडी हे रस्ते बंद झाले आहेत. निलंगा तालुक्यात कलांडी गावात रात्रभर झालेल्या पावसामुळे पहाटे दोन घरे पडली.

मांजरा प्रकल्प क्षेत्रातही मोठा पाऊस झाल्याने धरणाचे सहा दरवाजे उघडण्यात आले असून, पाच हजार २४१ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

**धाराशिव** जिल्ह्यात काल रात्रीपासून संततधार पाऊस सुरु आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ४७५ पूर्णांक आठ मिलिमीटर इतका सरासरी पाऊस झाला आहे. सर्वाधिक ५७४ पूर्णांक चार मिलिमीटर पावसाची नोंद वाशी तालुक्यात झाली आहे. **जालना** जिल्ह्यातही काल रात्री बहुतांश भागात पाऊस झाला. **परभणी** आणि **हिंगोली** जिल्ह्यातही मोठ्या प्रमाणात पाऊस असून, नदी - नाल्यांना पूर आला आहे. **छत्रपती संभाजीनगर** जिल्ह्यातल्या जायकवाडी धरणाचा पाणीसाठा ९९ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. धरणात सध्या ४९ हजार ४२६ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाण्याची आवक सुरु असून, १८ दरवाजातून ३७ हजार ७२८ घनफूट प्रतिसेकंद वेगानं पाणी गोदावरी नदीपात्रात सोडलं जात आहे.

**भंडारा** जिल्ह्यात आठवडाभराच्या विश्रांतीनंतर आज पावसानं सर्वदूर दमदार हजेरी लावली आहे. त्यामुळे नागरिकांना उकाड्यापासून दिलासा मिळाला आहे तर धानाला नवसंजीवनी मिळाल्यानं शेतकरी आनंदात आहेत. गोसेखुर्द धरणाचे ३३ पैकी १३ दरवाजे उघडण्यात आले आहेत.

**<><><><><>**

जेष्ठ अभिनेते दिग्दर्शक बाळ कर्वे यांचं आज सकाळी मुंबईत वार्धक्यानं निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. चिमणराव मालिकेत त्यांनी वठवलेली गुंड्याभाऊंची भूमिका अद्याप रसिकांच्या स्मरणात आहे. बन्या बापू, लपंडाव, सुंदरा सातारकर, चटक चांदणी अशा चित्रपटांमधून तर रथचक्र, तांदूळ निवडता निवडता, आई रिटायर होते, कुसुम मनोहर लेले, शांतता कोर्ट चालू आहे, सूर्याची पिल्ले अशा नाटकांमधून त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. सई परांजपे दिग्दर्शित कथा या हिंदी सिनेमातही कर्वे यांनी काम केलं होतं.

**//<><><><><>//**